# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित मुंबई

## (महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)

### जाहीर निविदा सूचना

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत **राबविण्यात आलेल्या विविध योजनांतील लाभार्थ्यांचे Beneficiary Survey, Impact Assessment व Post Disbursement Monitoring Framework** विकसित करण्यासाठी शासन मान्यताप्राप्त/शासन अनुदानित शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था तसेच राष्ट्रीय महत्त्वाच्या अनुभवी संस्थांकडून **तांत्रिक व वित्तीय प्रस्ताव (Technical & Financial Proposal)** मागविण्यात येत आहेत.

इच्छुक संस्थांनी आपले प्रस्ताव **दिनांक 22/07/2026 पर्यंत** महामंडळाच्या अधिकृत ई-मेलवर/कार्यालयात सादर करावेत. E-mail id: info@mpbcdc.in.

**अधिक माहितीसाठी** https://mpbcdc.maharashtra.gov.in येथे भेट द्यावी

सही /-

**व्यवस्थापकीय संचालक**

**महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित**

# विवरण पत्र -१

**संस्थेकडून अपेक्षित बाबी (Scope of Work)**

1. महामंडळाच्या सर्व विद्यमान योजना व कार्यक्रमांचे सर्वंकष मूल्यमापन करणे.

2. लाभार्थ्यांवर झालेल्या सामाजिक व आर्थिक परिणामांचे (Socio-Economic Impact) मूल्यांकन करणे(दरडोई उत्पन्न).

3. योजनांच्या अंमलबजावणीची परिणामकारकता (Effectiveness) व कार्यक्षमता (Efficiency) मोजणे.

4. योजना अंमलबजावणीतील त्रुटी, अडथळे व सुधारणा आवश्यक असलेली क्षेत्रे ओळखणे.

5. लाभार्थी समाधान (Beneficiary Satisfaction) सर्वेक्षण करून त्याचे विश्लेषण करणे.

6. विविध भागधारकांशी (Stakeholders) सल्लामसलत व संवाद (Consultations) आयोजित करणे.

7. मुख्य कार्यालय ,जिल्हानिहाय व विभागनिहाय अहवाल तयार करणे.

8. महामंडळाचे सामर्थ्य, कमकुवत बाजू, संधी व आव्हाने यांचे SWOT विश्लेषण करणे.

9. राष्ट्रीय विकास वित्तीय संस्थांच्या (Development Finance Institutions) कार्यपद्धतीशी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या कार्याचे तुलनात्मक विश्लेषण (Benchmarking) करणे.

10. महामंडळाची लाभार्थी पोहोच (Outreach), आर्थिक शाश्वतता (Financial Sustainability), डिजिटल प्रशासन (Digital Governance), विविध शासकीय योजनांमधील अभिसरण (Convergence) आणि सामाजिक परिणामकारकता (Social Impact) वाढविण्यासाठी धोरणात्मक शिफारसी (Policy Recommendations) सादर करणे.

********